CMYK

धाराशिव
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व
बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## भूमच्या गोलाई चौकात दोन पुतळ्यांमुळे तणाव!

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१६ मार्च -**

भूम शहरातील गोलाई चौक येथे दोन महापुरुषांचे पुतळे उभारणीमुळे तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. मध्यरात्री ही घटना घडली. या दोन्ही घटनांमुळे भूम शहरात काही काळ गोंधळाचे वातावरण निमर्णि झाले. शपरिस्थिती हाताबाहेर जाऊ नये यासाठी प्रशासन आणि पोलिसांनी तातडीने हालचाल करत कडक बंदोबस्त तैनात केला आहे. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि चौक परिसरात कडक बंदोबस्त तैनात करण्यात आला. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी परंडा, अंबी आणि धाराशिव येथूनही अतिरिक्त पोलीस पथके बोलावण्यात आली आहेत. दरम्यान, या प्रकरणावर तोडगा काढण्यासाठी प्रशासनाकडून बैठकींचे सत्र सुरू असून चर्चा सुरू होती.

शहरात शांतता आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाकडून सर्व पक्षांशी संवाद साधण्याचे प्रयत्न सुरू आहेत.सध्या गोलाई चौक परिसरात पोलिसांचा मोठा बंदोबस्त असून नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



## संक्षिप्त वृत्त...



### कदमवाडी शाळेत वासंतिक वर्गाची सुरुवात

**तुळजापूर, दि.१६ मार्च -**

तालुक्यातील नांदुरी केंद्रांतर्गत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कदमवाडी येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ साठी इयत्ता पहिलीच्या प्रवेश पात्र विद्यार्थ्यांच्या वासंतिक वर्गाची सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित करून त्यांचे शाळा व्यवस्थापन समिती, पालक व शाळेच्या वतीने पुष्पगुच्छ व फुगे देऊन स्वागत करण्यात आले. कार्यक्रमाला शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, सर्व सदस्य तसेच विद्यार्थ्यांचे पालक उपस्थित होते. जिल्हा परिषद शाळेचा पट वाढवण्यासाठी प्रवेश पात्र विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित करावा, असे आवाहन शाळेचे मुख्याध्यापक ज्ञानेश्वर घोडके यांनी केले. यावेळी शाळेतील शिक्षिका एस.आर. भुतेकर यांनी विद्यार्थ्यांना मिळणाऱ्या विविध शासकीय योजना, सुविधा तसेच शाळेत राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती पालकांना दिली.



### तेरणा महाविद्यालयात आयबीएम स्किल बिल्डिंगवर प्रशिक्षण

**धाराशिव, दि.१६ मार्च -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या बी.फार्मसी विभागातर्फे 'आयबीएम स्किल बिल्डिंग' या विषयावर एकदिवसीय प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. अनुदीप फाउंडेशन फॉर सोशल वेल्फेअर या संस्थेच्या सहकार्याने झालेल्या या प्रशिक्षणात सुमारे १०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेत विद्यार्थ्यांना आधुनिक डिजिटल कौशल्ये, रोजगारक्षमता वाढविणारे तांत्रिक ज्ञान तसेच आयबीएम स्किल बिल्ड प्लॅटफॉर्मद्वारे प्रमाणपत्र मिळविण्याची माहिती देण्यात आली. प्रशिक्षणाचे मार्गदर्शन प्रशिक्षक हृतिक सौन्दाडे यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी विद्यार्थ्यांनी कौशल्य विकासासाठी अशा प्लॅटफॉर्मचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले. कार्यक्रमाचे नियोजन विभागप्रमुख डॉ.पी.टी. माने, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर डॉ.जी.बी. चिवटे व त्यांच्या टीमने केले.

### भाटशिरपुरा येथून १२ वर्षीय मुलाचे अपहरण

**धाराशिव, दि.१६ मार्च -**

तालुक्यातील भाटशिरपुरा येथून १२ वर्षीय मुलाचे अज्ञात व्यक्तीकडून अपहरण झाल्याची घटना समोर आली असून या प्रकरणी शिराढोण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी बबलु रामभवन राय (वय ३७, रा. भाटशिरपुरा ता. कळंब जि. धाराशिव, मूळ रा. पटना, बिहार) यांचा मुलगा करणकुमार बबलु राय (वय १२) यास दि. १४ मार्च रोजी दुपारी सुमारे १.३० वाजण्याच्या सुमारास भाटशिरपुरा येथील दिनेश सूर्यकांत वाघमारे यांच्या घराजवळून अज्ञात व्यक्तीने पळवून नेल्याची फिर्याद देण्यात आली आहे. या प्रकरणी अधिकचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.



## तुळजाभवानी नगरीत शंभूप्रेमींची अनोखी परंपरा

### तुळजापुरातील तरुणाईचा आदर्श उपक्रम; 'धर्मवीर बलिदान मास' श्रद्धा-निष्ठेसह शंभूप्रेमींचे दैनंदिन अभिवादन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.१६ मार्च -**

महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या पवित्र नगरीत तरुणाईकडून 'धर्मवीर बलिदान मास' मोठ्या श्रद्धा व निष्ठेने साजरा केला जात आहे. विविध सामाजिक, धार्मिक व ऐतिहासिक उपक्रमांच्या माध्यमातून छत्रपती संभाजी महाराजांना दररोज अभिवादन करण्यात येत असून या उपक्रमामुळे नागरिकांमध्येही प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे.



तुळजापूरातील शिवछत्रपती क्रिकेट क्लबच्या वतीने बलिदान मास काळात दररोज सकाळी ९ वाजता छत्रपती संभाजी महाराज पुतळा परिसरात स्वच्छता मोहीम राबवली जाते. तरुण मंडळी परिसर पाण्याने धुवून स्वच्छ करतात, राजांच्या पादुकांची स्वच्छता करून गुलाबफुलांनी आकर्षक सजावट करतात. त्यानंतर सर्वजण एकत्र येऊन प्रेरणामंत्राचे सामूहिक पठण करतात. गेल्या सुमारे १५ वर्षांपासून तुळजापूरातील तरुणांकडून हा उपक्रम नित्यनियमाने राबवला जात आहे. वर्षागणिक या उपक्रमात सहभागी होणाऱ्या तरुणांची संख्या वाढत असून बलिदान मास हा केवळ तरुणांपुरता मर्यादित न राहता सर्व समाजघटकांचा सहभाग असलेला प्रेरणादायी उपक्रम बनत आहे. दरम्यान, कार्यक्रमादरम्यान नागरिकांनाही विशेष निमंत्रण देण्यात येत असून त्यांच्या उपस्थितीत इतिहास कथनाचे कार्यक्रम घेतले जातात. यामुळे नव्या पिढीला छत्रपती संभाजी महाराजांच्या पराक्रमाची व बलिदानाची माहिती मिळत आहे.

या संपूर्ण उपक्रमाचे मार्गदर्शन शिवछत्रपती क्लबचे विपीन शिंदे करत असून शहरातील अनेक तरुण त्यात सक्रिय सहभाग घेत आहेत. दरवर्षीप्रमाणे यंदाही 'धर्मवीर बलिदान मास'ची सांगता गुढीपाडव्याच्या आदल्या दिवशी (दि.१८) शहरातून फेरी काढून करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

## गॅस सिलेंडरसाठी धाराशिव शहरात नागरिकांची गर्दी

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मार्च -**

शहरातील समर्थ नगर परिसरात गॅस सिलेंडर मिळवण्यासाठी सोमवारी नागरिकांची मोठी गर्दी झाल्याचे चित्र पाहायला मिळाले. सणासुदीच्या पार्श्वभूमीवर गॅसची मागणी वाढल्याने अनेक नागरिक पहाटेपासूनच वितरण केंद्राबाहेर रांगेत उभे असल्याचे दिसून आले.



भविष्यात गॅस सिलेंडर मिळेल की नाही या भीतीमुळे अनेक नागरिकांनी एकाच वेळी गॅस घेण्यासाठी गर्दी केल्याने काही ठिकाणी भलीम मोठी रांग लागली होती. विशेषतः महिला व ज्येष्ठ नागरिकांना तासन्तास रांगेत थांबावे लागल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली.

दरम्यान, जिल्हा प्रशासनाने शहरात गॅस सिलेंडरचा कोणताही तुटवडा नसल्याचे स्पष्ट केले असून नागरिकांनी घाबरून गर्दी करू नये, असे आवाहन केले आहे. तसेच सणासुदीच्या काळात गॅसचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी प्रशासन व गॅस एजन्सींनी योग्य नियोजन करावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेचा शरण पाटलांकडून आढावा

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.१६ मार्च -**

उमरगा-लोहारा विधानसभा सह-अध्यक्षपदी निवड झाल्यानंतर शरण बसवराज पाटील यांनी सोमवारी (दि.१६) उमरगा तहसील कार्यालयाला सदिच्छा भेट देत मुख्यमंत्री बळीराजा पाणंद रस्ता योजनेचा आढावा घेतला. यावेळी महसूल विभागातील अधिकारी व शेतकऱ्यांशी चर्चा करून योजनेची माहिती, रस्त्यांची निवड व अडचणींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.



यावेळी महसूल विभागाच्या वतीने शरण पाटील यांचा सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना त्यांनी सांगितले की, मजबूत शेतरस्त्यांमुळे शेतमालाची वाहतूक सुलभ होऊन दुग्धव्यवसाय, भाजीपाला, फळबाग, कुक्कुटपालन व शेळीपालन यांसारख्या शेतीपूरक व्यवसायांना चालना मिळेल. उमरगा व लोहारा तालुक्यातील काही शेतरस्त्यांची कामे पूर्ण झाली असून उर्वरित कामे प्रगतीपथावर असल्याचे त्यांनी सांगितले. दोन्ही तालुके पाणंदमुक्त करण्यासाठी ही योजना प्रभावीपणे राबविण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी उपविभागीय अधिकारी दत्तू शेवाळे, तहसीलदार गोविंद येरमे, रफिक तांबोळी, प्रकाश आष्टे, दिलीप भालेराव, योगेश राठोड, अभियंता दिलीप बिराजदार उपस्थित होते.

## इस्रो सहलीमुळे विद्यार्थ्यांच्या विज्ञाननिष्ठ विचारसरणीला चालना मिळेल : अर्चनाताई पाटील

### जिल्हा परिषद विद्यार्थ्यांची इस्रो सहल...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१६ मार्च -**

इस्रोच्या शैक्षणिक सहलीमुळे विद्यार्थ्यांच्या विज्ञाननिष्ठ विचारसरणीला चालना मिळून त्यांच्यात संशोधनाची आणि नवोपक्रमांची प्रेरणा निर्माण होईल, असा विश्वास जि.प. अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी व्यक्त केला.



समग्र शिक्षाच्या राष्ट्रीय आविष्कार अभियान अंतर्गत धाराशिव जिल्हा परिषदेतील विद्यार्थ्यांची राज्याबाहेरील शैक्षणिक सहल बेंगलोर मार्गे केरळकडे रवाना झाली. विद्यार्थ्यांच्या गाड्यांना जिल्हा परिषद अध्यक्षा अर्चनाताई पाटील यांनी हिरवा झेंडा दाखवून सहलीस मार्गस्थ केले. या सहलीसाठी जिल्ह्यातील विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उत्कृष्ट गुण मिळवलेल्या एकूण ६७ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून या सहलीचा कालावधी सहा दिवसांचा आहे. या सहलीद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून विज्ञान, इतिहास आणि समाजज्ञानाची ओळख करून देण्याचा उद्देश आहे. केरळमधील विक्रम साराभाई स्पेस सेंटर, नेपियर म्युझियम, त्रिवेंद्रम झू, कोलंब बीच, लाईट हाऊस, सागरीका मरीन एक्वेरियम व पद्मनाभस्वामी मंदिर, तसेच बेंगलोरमधील विश्वेश्वरय्या म्युझियम, उच्च न्यायालय आणि विधानसभा भवन अशी विविध महत्त्वाची ठिकाणे विद्यार्थ्यांना पाहण्याची संधी मिळणार आहे. जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांनी संशोधक वृत्ती जोपासून विज्ञान, तंत्रज्ञान आणि विविध क्षेत्रांमध्ये नावीन्यपूर्ण कामगिरी करावी. सहलीत मिळालेला अनुभव लेखन स्वरूपात जतन करून त्याचे सादरीकरण करावे, केवळ पुस्तकातूनच नव्हे, तर प्रत्यक्ष अनुभवातूनही ज्ञान मिळते आणि ही सहल विद्यार्थ्यांना नव्या दृष्टीकोनाची प्रेरणा देईल, असा विश्वास अर्चनाताई पाटील यांनी व्यक्त केला.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, शिक्षणाधिकारी रवींद्र खंदारे, शिक्षण विस्तार अधिकारी दत्तप्रसाद जंगम, कार्यक्रम समन्वयक सुनिता काटकर, संशोधन सहाय्यक तेलंग, कनिष्ठ अभियंता सुजित गरड, राम राऊत आदी उपस्थित होते.

## तेरखेडा येथे 'छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर' संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**तेरखेडा, दि.१६ मार्च -**

राज्य सरकारच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजस्व समाधान शिबिर अभियानांतर्गत वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे (दि.१४ मार्च) सुहासिनी मंगल कार्यालयात शिबिर उत्साहात पार पडले. या शिबिरात तेरखेडा जिल्हा परिषद गटातील विविध गावांतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शविली.



शिबिरात नागरिकांच्या विविध समस्या ऐकून त्यांचे निराकरण करण्यात आले. तसेच शेकडो नागरिकांना विविध शासकीय योजनांचे लाभ व आवश्यक प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. सरकार आपल्या दारी या संकल्पनेतून नागरिकांना तहसील कार्यालयात वारंवार जावे लागू नये, यासाठी या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर, उपजिल्हाधिकारी (मध्यम प्रकल्प) संतोष राऊत, उपविभागीय अधिकारी गणेश शिंदे, तहसीलदार प्रकाश मेहेत्रे, नायब तहसीलदार पूजा पाटील, गटविकास अधिकारी ओंकार गायकवाड, तलाठी प्रवीण पालके उपस्थित होते.

तसेच जिल्हा परिषद सदस्य विकी चव्हाण, पंचायत समिती अध्यक्षा प्रणिता गायकवाड, उपसभापती नितीन रणदिवे, पंचायत समिती सदस्या पूनम घोलप व प्रगतशील शेतकरी मंगेश कडवकर यांची उपस्थिती होती.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी विद्याचरण कडवकर यांनी सरकार विविध योजना नागरिकांच्या दारी आणत असल्याचे सांगत पात्र लाभार्थ्यांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

तसेच योजनांची अंमलबजावणी करताना कोणताही कामचुकारपणा होऊ नये, असे निर्देशही त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

## कर्जमाफीची मुदत ३१ मे २०२६ पर्यंत वाढवावी

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१६ मार्च -**

राज्य सरकारने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमाफी योजनेची मुदत ३० सप्टेंबर २०२५ ऐवजी ३१ मे २०२६ पर्यंत वाढवावी, अशी मागणी शेतकरी संघर्ष समितीने केली आहे. यासंदर्भात सोमवारी (दि.१६) अप्पर तहसीलदार प्रमोद गायकवाड यांना निवेदन देण्यात आले.

### शेतकरी संघर्ष समितीची मागणी...

निवेदनात म्हटले आहे की, सध्या या योजनेअंतर्गत ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत थकीत असलेल्या पीक कर्जावर २ लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याची तर नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचे प्रोत्साहन देण्याची घोषणा करण्यात आली आहे. मात्र गेल्या काही वर्षांत दुष्काळ, अतिवृष्टी आणि मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती बिकट झाली आहे.

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती ३१ मे २०२६ रोजी साजरी होत असल्याने त्याचे औचित्य साधून ३१ मे २०२६ पर्यंत थकीत असलेल्या शेतकऱ्यांचे सातबारा कोरे करून त्यांना कर्जमुक्ती द्यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

हे निवेदन महिला शेतकरी सुनिता पंडित पाटील यांच्या हस्ते देण्यात आले.

यावेळी समन्वयक दिलीप जोशी, जिल्हाध्यक्ष सरदारसिंग ठाकुर, तालुकाध्यक्ष व्यंकट पाटील यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते.

## टाकळीचा पठ्ठ्या युवा शाहीर विठ्ठल शेंद्रे महाराष्ट्र गाजवतोय!

### धाराशिवचा 'मावळे लोककलेचे' हा सांस्कृतिक समूह सध्या राज्यभरात शाहिरीचा झेंडा उंचावतोय...



सोलापूर तरुण भारत विशेष...

**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.१६ मार्च -**

धाराशिव तालुक्यातील टाकळी बेंबळी येथील युवा शाहीर विठ्ठल परमेश्वर शेंद्रे यांनी आपल्या कलेच्या जोरावर अल्पावधीतच सांस्कृतिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. ग्रामीण भागातून पुढे येत त्यांनी शाहिरी, पोवाडे आणि लोककलेच्या माध्यमातून इतिहासाची आणि संस्कृतीची गाथा लोकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य सुरू केले आहे.

विठ्ठल शेंद्रे यांनी गावातील जिल्हा परिषद शाळेत प्राथमिक शिक्षण घेतले. सध्या तो धाराशिव येथील व्यंकटेश महाजन महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेत आहेत. शिक्षण घेत असतानाच त्यांनी आपल्या अंगी असलेल्या शाहिरी कलेला जपण्याचा आणि विकसित करण्याचा निर्धार केला. लहानपणापासूनच पोवाडे आणि शाहिरी सादरीकरणाची आवड असल्यामुळे त्यांनी सातत्याने सराव करत आपल्या आवाजात आणि सादरीकरणात वेगळेपण निर्माण केले. सुरुवातीच्या काळात सोशल मीडिया आणि यूट्यूबच्या माध्यमातून त्यांनी आपले पोवाडे सादर करत कलेला व्यासपीठ मिळवून दिले. या माध्यमातून त्यांच्या सादरीकरणाला चांगला प्रतिसाद मिळू लागला. त्यानंतर त्यांनी सांगली येथील प्रसिद्ध शाहीर डॉ. देवानंद माळी यांच्याकडे जाऊन शाहिरी कलेचे मार्गदर्शन घेतले.

शाहिरी कलेची आवड असलेल्या जिल्ह्यातील युवक-युवतींना एकत्र आणण्याचा त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या प्रेरणेने विविध गावांतील कलाकार एकत्र आले आणि मावळे लोककलेचे हा सांस्कृतिक समूह स्थापन झाला. या समूहाच्या माध्यमातून पोवाडे, ओव्या, पारंपरिक वादन आणि शाहिरी सादरीकरण करत छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा गावोगावी पोहोचवली जात आहे. युवा शाहीर विठ्ठल परमेश्वर शेंद्रे, यश देशपांडे आणि प्रदीप मसे या तिघांच्या पुढाकारातून या समूहाची स्थापना करण्यात आली आहे. गेल्या दोन वर्षांपासून शाहीर विठ्ठल शेंद्रे विविध ठिकाणी जोशपूर्ण शाहिरी कार्यक्रम सादर करत आहेत. लोकांकडून मिळणारा वाढता प्रतिसाद आणि प्रेम पाहता यंदा या कलाकारांनी एकत्र येऊन आपल्या उपक्रमाला मावळे लोककलेचे असे नाव देत औपचारिक स्वरूप दिले.



> शाहिरी कलेतून स्वराज्याची प्रेरणा पोहोचवायची आहे. मी छोट्याशा टाकळी गावातून पुढे आलो आहे. ग्रामीण भागात वाढल्यामुळे साधनांची कमतरता होती आणि योग्य मार्गदर्शकही सहज उपलब्ध नव्हते. त्यामुळे सुरुवातीच्या काळात सोशल मीडियाचा उपयोग करून मी ही कला शिकण्याचा आणि विकसित करण्याचा प्रयत्न केला. शाहिरीची टीम तयार करतानाही अनेक अडचणी आल्या; पण निश्चय ठाम होता. सहकारी मित्रांच्या मदतीने 'मावळे लोककलेचे' हा समूह उभा राहिला. आता पुढे हा शाहिरी जलसा राज्यभर गाजवायचा आहे. ही कला केवळ मनोरंजनासाठी नव्हे, तर सेवा म्हणून जोपासत महाराष्ट्राचा इतिहास आणि संस्कृती लोकांपर्यंत पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न कायम राहील.
>
> **- युवा शाहीर विठ्ठल शेंद्रे**

या समूहात विविध गावांमधील गुणी कलाकार सहभागी झाले आहेत. पोवाडे, ओव्या, गोंधळ, पारंपरिक वादन आणि शाहिरी सादरीकरणाच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराजांचा इतिहास आणि महाराष्ट्राची समृद्ध सांस्कृतिक परंपरा लोकांपर्यंत पोहोचवण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. या समूहातील वादक कलाकारांमध्ये ढोलकीवर अमोल बोंदर (उत्मी, कायापुर), हार्मोनियमवर सुधीर पवार (धाराशिव), हलगी-दिमडी ढोलकी- बासरीवर परमेश्वर माने (धाराशिव) तर संबळ वादनासाठी अक्षय इगवे (नळदुर्ग) यांचा समावेश आहे. तसेच कोरस कलाकार म्हणून धर्मराज कांबळे (देवकुरुळी), प्रभाकर आगळे (बरमगाव), प्रज्ञा सुकाळे (तेर), रेणुका कुलकर्णी (वाशी) आणि तनुजा कदम (कानेगाव) हे कलाकारही शाहिरी सादरीकरणात सहभागी होत आहेत. संधी मिळेल तेव्हा आणि जिथे निमंत्रण मिळेल तिथे जाऊन विठ्ठल शेंद्रे आणि त्यांचा समूह जोशपूर्ण शाहिरी जलसा सादर करत आहे. त्यांच्या सादरीकरणाला लोकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असून ग्रामीण भागात शाहिरी परंपरेला नवसंजीवनी मिळत आहे. तरुण पिढीमध्ये इतिहासाची जाणीव आणि सांस्कृतिक अभिमान निर्माण करण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील आहेत.

महाराष्ट्राच्या शाहिरी, पोवाडे आणि लोककलेचा वारसा जपण्याचा संकल्प घेऊन मावळे लोककलेचे हा सांस्कृतिक समूह सध्या राज्यभरात शाहिरीचा झेंडा उंचावत आहे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# उषाताई पाटील यांच्या रूपाने देवणी तालुक्याला दुसऱ्यांदा अध्यक्षपदाची संधी

**तभा वृत्तसेवा/रियाज मोमीन**

**वलांडी, दि. १६ मार्च :** देवणी तालुक्याच्या राजकीय आणि सामाजिक क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरत, उषाताई पाटील तळेगावकर यांच्या रूपाने तालुक्याला दुसऱ्यांदा अध्यक्षपदाची संधी मिळाली आहे. त्यांच्या निवडीमुळे देवणी तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

तळेगावकर घराणे हे सामाजिक कार्यात सक्रिय असून त्यांनी विविध विकासकामांमध्ये नेहमीच पुढाकार घेतला आहे. ग्रामीण भागातील महिलांचे सक्षमीकरण, शिक्षण, आरोग्य तसेच मूलभूत सुविधांच्या प्रश्नांवर त्यांनी सातत्याने काम केले आहे. त्यांच्या नेतृत्वामुळे तालुक्यात अनेक विकासकामांना गती मिळेल, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

देवणी तालुक्याला यापूर्वी साहेरा मिर्झा बेग यांच्या रूपाने अध्यक्षपदाची संधी मिळाली होती.आता पुन्हा एकदा तालुक्याच्या वाट्याला हे पद आल्याने स्थानिक कार्यकर्ते आणि नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. उषाताई पाटील तळेगावकर यांच्या निवडीमुळे तालुक्याच्या विकासाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास अनेकांनी व्यक्त केला आहे.

स्वर्गीय सहकारमहर्षी रामचंद्र पाटील तळेगावकर हे तत्कालीन उस्मानाबाद जिल्हा असताना जिल्हा परिषद सदस्य होते त्यानंतर तळेगावकर घराण्याला जिल्हा परिषद सदस्यत्वांनी सातत्याने हुलकावणी दिली होती.अखेर त्यांच्या सुनबाई वलांडी जिल्हा परिषद गटातून अत्यंत चुरशीच्या झालेल्या लढतीत निवडून येत अध्यक्षपदाला गवसणी घातली आहे.



त्यांच्या निवडीबद्दल विविध राजकीय, सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांनी शुभेच्छा देत पुढील कार्यकाळासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. तालुक्यातील प्रलंबित प्रश्न सोडवून विकासकामांना चालना देण्याची अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

उषाताई पाटील तळेगावकर यांनी अध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारताना तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. सर्व घटकांना सोबत घेऊन काम करत तालुक्यातील मूलभूत समस्या सोडविण्यावर भर देणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

## संक्षिप्त...

### दैवशाला साखरे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा संपन्न



**अहमदपूर :** तालुक्यातील सांगवीतांडा येथील प्राथमिक आश्रमशाळेत स्वयंपाकी म्हणून कार्यरत असलेल्या दैवशाला रामराव साखरे यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा १४ मार्च रोजी शाळेत उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंत भटके मागास जनसेवा मंडळाचे अध्यक्ष डॉ.पांडूरंग टोंपे तर व्यासपीठावर संस्थेच्या सचिव अहमदपूर लिनेस क्लबच्या नुतन अध्यक्षा शोभाताई टोंपे, केंद्रप्रमुख संभाजी कासले,गणपतराव कानवटे,विनोद गुंठे, महानंदा गोरगे, रामकिशन कराड, मनोज नरवटे ह.भ.प.परमेश्र्वर महाराज पांचाळ,चंद्रकलाबाई गुंठे, बालिका राजगे,अर्चना येचाळे यासह सत्कारमूर्ती दैवशाला रामराव साखरे आदींची प्रमुख उपस्थिती होती. प्राथमिक आश्रमशाळा सांगवीतांडा येथे तब्बल २५ वर्षांची यशस्वी सेवा करून दैवशाला रामराव साखरे ह्या सेवानिवृत्त झाल्या आहेत.त्यामूळे उपस्थित मान्यवरांनी त्यांना या सेवानिवृत्ती निमित्त सत्कार करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विलास पडिले यांनी सूत्रसंचालन नरसिंग सांगवीकर यांनी तर आभार नागनाथ जवणे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्युलत्ता घोगरे,रामचंद्र बाबळसरे, पंकज आडे,अजय मिटकरे,शरद राठोड,बबीता यादव, ज्ञानोबा व्हटमुर्गे,अक्षय फुले,सचिन येचाळे, लक्ष्मी राजगे, वैभव व्हटमुर्गे, सुनिता चव्हाण, सोनू शेळके,केशव राठोड आदींनी परिश्रम घेतले.

### लातूर राणी अंकुलगा एसटीचे ऐन कांबळगा गावातच ब्रेक फेल... चालकाच्या सतर्कतेमुळे मोठा अनर्थ टळला



**शिरूर अनंतपाळ :** निलंगा आगारातील घटना ताजी असताना लातूर ते राणी अंकुलगा एसटी बस लातूरहून राणी अंकुलगा जाण्यासाठी निघाली असताना दुपारी सुमारे २.३० च्या दरम्यान कांबळगा गावात प्रवेश करत असताना अचानक ब्रेक लागत नसल्याचे चालक शिंदे यांच्या लक्ष्यात आल्यानंतर लगेचच त्यांनी प्रसंगावधान राखत सदरील बस कांबळगा गावच्या रस्त्याच्या बाजूला असलेल्या करडईच्या शेतात वळवून त्या ठिकाणी चिखल असल्याने बस थांबल्यामुळे ऐन गावात होणारा मोठा अनर्थ टळला आहे. बस जर आणखी १० फूट पुढे गेली असती तर खूप मोठी दुर्घटना घडली असती.या बस मध्ये जवळपास ३७ प्रवासी प्रवास करत होते.

राणी अंकुलगा ते लातूर या मार्गाची बस नियमितपणे वेळेवर येत नाही,सतत ही गाडी कोणत्या ना कोणत्या कारणाने सतत नादुरुस्त असते,बसला यायला उशीर जर झाला तर ती शिरूर अनंतपाळ पासूनच परत जाण्याच्या घटना अनेक वेळा घडलेल्या आहेत.यासंबंधीची माहिती एसटी प्रशासनाच्या लक्षात आणून देण्याचा अनेक नागरिकांनी प्रयत्न केला पण त्यात काहीच सुधारणा झाली नाही.शेवटी जे घडायचे होते ते घडलेच.प्रशासन एवढे सुस्त होते कश्यामुळे,प्रवाशांच्या जीवाशी खेळताना अशा बेजबाबदार कर्मचाऱ्यांना काही कसे वाटत नाही अशा तीव्र प्रतिक्रिया नागरिकांतून उमटत आहेत.

राणी अंकुलगा जाणारी जीर्ण व मोडकळीस असलेल्या गाड्या दिल्या जातात अशी चर्चा प्रवाश्यांत होत आहे. जरी जीर्ण झालेल्या व मोडकळीस आलेल्या गाड्या देत असतील तरी त्या योग्य प्रकारे न तपासता सोबत आवश्यक अशा स्टेपणी,जॅक,टॉमी व आवश्यक ती पाने कधीच दिले जात नाहीत म्हणून अशा घटना वारंवार घडतात असा स्पष्ट आरोप प्रवाशांचा आहे.तरी महामंडळातील अधिकाऱ्यांनी याची सखोल चौकशी करून गाडी देताना जबाबदारीने सर्व साहित्यासह गाडी प्रवासासाठी दिले तर बरे होईल व अशा घटना घडणार नाहीत.

### दैठणा येथे बीजोउत्सव सप्ताहाला पोलिस निरीक्षक भंडे यांची भेट

**दैठण :** दैठणा येथे सुरू असलेल्या अखंड हरीनामाच्या १४ दिवसांच्या बीजोउत्सव सप्ताहाला पोलिस निरीक्षक भंडे साहेब (पोलीस ठाणे शिरूर अनंतपाळ) यांनी भेट दिली. यावेळी त्यांनी जनक अण्णा अपसिंगेकर महाराज यांचे दर्शन घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले.

या प्रसंगी जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक तथा दैटना येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायटीचे चेअरमन व्यंकटराव पाटील, दैठणा येथील विद्यमान उपसरपंच योगेश बिरादार, पत्रकार आर. बी. मुळे, काँग्रेस पक्षाचे एकनिष्ठ कार्यकर्ते जनार्दनराव पाटील सुमठाणकर तसेच दैठणा येथील समाजसेवक सुखदेव पाटील आणि विजयकुमार सामान गावे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी अखंड हरीनाम सप्ताहाच्या आयोजनाचे कौतुक केले तसेच गावातील धार्मिक व सामाजिक उपक्रमांना शुभेच्छा दिल्या.

# डॉ. आंबेडकर जयंती समिती अध्यक्षपदी वीरेंद्र वाघमारे

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. १६ मार्च :** जळकोट येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती समितीच्या अध्यक्षपदी अध्यक्षपदी वीरेंद्र वाघमारे यांची निवड करण्यात आली आहे.

समितीच्या इतर पदाधिकाऱ्यात उपाध्यक्ष राजकुमार गवळे तर सचिवपदी सुधाकर कांबळे यांची प्राचार्य संपत शिंगाडे यांच्या अध्यक्षतेखाली बुध्द विहारातील बैठकीत निवड करण्यात आली. उर्वरित कार्यकारिणीत सहसचिव संतोष ढवळे, कोषाध्यक्ष अरुण कांबळे, सहकोषाध्यक्ष कैलास कांबळे, संघटक माधव वाघमारे यांचा समावेश आहे. या निवडीप्रसंगी अविनाश गायकवाड, पिराजी कोकणे, विजयकुमार शिंगाडे, वाघमारे उत्तम, वाघमारे उद्धव वाघमारे धनाजी, वाघमारे सिद्धार्थ, आकाश कदम देवानंद गायकवाड, वाघमारे माधव, गडकर संतोष प्रशांत गायकवाड, किरण वाघमारे, अजय वाघमारे गायकवाड दत्ता, गायकवाड किरण, नागेश गवळे कांबळे पद्माकर, वाघमारे यशवंत, गायकवाड सचिन दीपक वाघमारे, राजकुमार गवळे, सचिन वाघमारे, सूर्यकांत वाघमारे, गायकवाड आकाश आदींसह समाज बांधव उपस्थित होते.

# मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानाचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर, दि. १६ मार्च :** महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या महत्त्वाकांक्षी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत अभियानाचा शुभारंभ आंबुलगा (ता. चाकूर) येथे, दि. १३ मार्च रोजी उत्साहात करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन पं. स.चे उपसभापती भुजंग शिंदे, तहसिलदार नरसिंग जाधव, गटविकास अधिकारी संतोष वंगवाडे आणि सरपंच विद्याबाई तेलंगे यांच्या हस्ते झाले.

अंबुलगा ग्रामपंचायतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान स्पर्धेत सहभाग नोंदविला आहे. या अभियानांतर्गत ग्रामपंचायतीचे कामकाज अधिक पारदर्शक आणि डिजिटल करण्यावर भर दिला जाणार आहे. यामध्ये डिजिटल शाळा, कर वसुली, जन्म-मृत्यू दाखले तसेच विविध शासकीय योजनांची माहिती एका क्लिकवर उपलब्ध करून देण्याची व्यवस्था केली जाणार आहे. तसेच ग्रामपंचायतीचे नमुना ८, ९, १० आणि मालमत्ता कराची माहिती ऑनलाइन उपलब्ध करून देणे, ग्रामपंचायत स्तरावर पारदर्शक प्रशासन निर्माण करणे आणि नागरिकांशी थेट संवाद साधण्यावर भर दिला जाणार आहे. यासोबतच सीसीटीव्ही जोडणी, डिजिटल शाळा आणि अंगणवाडी केंद्रांच्या माध्यमातून ग्रामीण भागाचा विकास साधण्याचा उद्देश या अभियानामागे आहे. यावेळी उपसरपंच गोविंद जाधव, माजी उपसरपंच दत्तात्रय गरड, गणेश सुर्यवंशी, ज्ञानेश्र्वर गोमसाळे आदी उपस्थित होते.

# वसंतराव पाटील शाळेचे स्नेहसंमेलन उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. १६ मार्च :** औराद शहाजनी येथील सांस्कृति प्रतिष्ठान संचलित वसंतराव पाटील शाळेचे स्नेहसंमेलन नुकतेच उत्साहात पार पडले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य डॉ. सुवर्णा जाधव, जि. प. सदस्या योगिता जाधव उपस्थित होत्या.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रमाता राजमाता जिजाऊ व क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन व दीप प्रज्वलन करून करण्यात आले. यावेळी राजा पाटील, पी आर पाटील, सुधाकर शेटगार, श्रीमती वंदना कुलकर्णी, प्रा.दत्ता माने, डॉ. शारदा जाधव उपस्थित होते. याप्रसंगी स्पर्धा परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा त्यांच्या आई-वडिलांसह सत्कार करण्यात आला.

यावेळी डॉ. सुवर्णा जाधव यांनी पालकांनी आपल्या पाल्याला मात्र भाषेतूनच शिक्षण द्यावे अभ्यासक्रमातील संकल्पना या मातृभाषेतूनच समजत असल्याचे त्या म्हणाल्या.

याप्रसंगी विद्यार्थ्यांनी कहा गये संस्कार, काहीही झालं तरी हरायचं नाही, वक्त की कसोटी हे नाटिका प्रभावीपणे सादर केले. होळी, जागतिक मातृभाषा दिन, महिला दिन,

या सर्वांचे औचित्य साधून होळी वरचे मातृभाषेवरचे, महिला दिनावरचे, अंधश्रद्धा निर्मूलनचे, आई-वडिलांवरचे असे विविध प्रकारचे समूह नृत्य विद्यार्थ्यांनी सादर केले. किंबहुना शेतकरी गीत, कोळी गीत, बेटी हू मै बेटी, भक्ती गीत रिमिक्स गीत भारुड, लिलीपुट, राजस्थानी गाणं, तेलगू गीत, ये जिंदगी, हे प्रेरणादायी गीत आरंभ है प्रचंड, धुरंदर आदी गाण्यावर अभिनय करून प्रेक्षकांची मने जिंकली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन विशाल बिरादार यांनी केले. तर आभार प्रा. दत्ता माने यांनी मानले.

# यशवंतराव चव्हाण जयंती साजरी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १६ मार्च :** लातूर तालुक्यातील मळवटी येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार व महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या जयंतीनिमित्त लातूर पंचायत समितीचे नूतन सभापती श्रीकांत बैले यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून पुष्पहार अर्पण करून त्यांना विनम्र अभिवादन करण्यात आले.

यानंतर इयत्ता १० वी उन्हाळी वर्गाचे उद्घाटन सभापती श्रीकांत बैले यांच्या हस्ते करण्यात आले. तसेच लातूर पंचायत समितीच्या सभापतीपदी श्रीकांत बैले यांची निवड झाल्यामुळे विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक युवराज शिंदे यांच्या हस्ते शाल, पुष्पहार व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लातूर पंचायत समितीमध्ये तालुका व्यवस्थापक नितेश शिंदे हे होते. यावेळी बैले व शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात मुख्याध्यापक शिंदे यांनी १० वी वर्गाच्या उन्हाळी वर्गाबद्दल विद्यार्थ्यांना व पालकांना वर्षभराच्या

नियोजनाबद्दल माहिती देण्यात आली. या कार्यक्रम प्रसंगी विद्यालयाचे माजी विद्यार्थी हरिश्र्चंद्र बैले व आकाश शिंदे यांची सिव्हिल इंजिनिअर पदी नियुक्ती झाली. विद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी पालक ताजुद्दीन शेख, आनंद ढोक , आबासाहेब कांबळे तसेच विद्यालयाचे शिक्षक श्रीकृष्ण पवार, वैभवी पवार, विलास गिरी, मंजुषा शिंदे, मोनिका वंजारे, व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन जाकेरअली सय्यद यांनी केले.

# डॉ. अरविंद भातांब्रे यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. १६ मार्च :** शिरूर अनंतपाळ शहरातील जामा मस्जिद येथे सुरू असलेल्या पवित्र रमजान महिन्याच्या पार्श्र्वभूमीवर काँग्रेस पक्षाचे नेते डॉ.अरविंद भातांब्रे यांच्या वतीने इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी,शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे,चेअरमन रामकिशन गड्डीमे,काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अशोक कोरे,राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष व्यंकट हांद्राळे,नगरसेवक सुधीर लखनगावे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना डॉ.अरविंद भातांब्रे यांनी रमजान हा केवळ उपवासाचा नाही,तर संयम,त्याग,बंधुभाव आणि अल्लाहची इबादत करण्याचा पवित्र महिना आहे.दिवसभर कडक ऊन असतानाही रोजा पाळून,संयम राखून संध्याकाळी जो रोजा सोडला जातो,तो इफ्तारचा क्षण खूप पवित्र असतो.इफ्तार पार्टी म्हणजे केवळ जेवण नाही,तर ती एकात्मतेची आणि सलोख्याची भावना असून आज आपल्या या कार्यक्रमात विविध जाती धर्मांचे लोक एकत्र येऊन हा सण साजरा करत आहेत हीच आपली खरी आपल्या देशाची ताकद आहे.अशा कार्यक्रमांमुळे समाजात जातीय सलोखा अधिक दृढ होऊन बंधूभाव निर्माण होतो.

रमजानचा हा पवित्र महिना सर्वांच्या आयुष्यात शांती,सौहार्द आणि समृद्धी घेऊन येवो. आपल्या देशात आणि जगात नेहमी शांती नांदो असे मनोमन डॉ.अरविंद भातांब्रे यांनी व्यक्त केले.या वेळी युवा सामाजिक कार्यकर्ते आसिफ उजेडे यांच्या वाढदिवसानिमित्त उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला या प्रसंगी प्रदेश सचिव महादेव आवाळे व चेअरमन रामकिशन गड्डीमे यांनी शुभेच्छापर मनोगत व्यक्त करून उपस्थित सर्व मुस्लिम बांधवांना पवित्र रमजान महिन्याच्या शुभेच्छा दिल्या या वेळी सोमेश्र्वर तोंडारे,गुरूनाथ अचवले, विश्र्वनाथ हंद्राळे,अकबर तांबोळी,काशिनाथ धुमाळे,इरफान तांबोळी, महेबुब तांबोळी,तसेच मुस्लिम धर्मगुरू व मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते या इफ्तार पार्टीचे आयोजन आसिफ उजेडे यांनी केले होते.

# रेणापूर तालुक्यात केंद्रप्रमुख परीक्षा उत्तीर्ण शिक्षकांचा सत्कार



**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. १६ मार्च :** पंचायत समिती रेणापूरचे गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडिया व रेणापूर शिक्षक पतसंस्थेचे चेअरमन गोपाळराव पडिले सर यांच्या अध्यक्षतेखाली हॉटेल गंधर्व येथे केंद्रप्रमुख परीक्षा उत्तीर्ण शिक्षकांचा सत्कार करण्यात आला.

या परीक्षेत रेणापूर तालुक्यातील विलास यादव यांनी महाराष्ट्रातून द्वितीय क्रमांक मिळवला, तर उमाकांत कोंपले यांनी लातूर जिल्ह्यात तृतीय क्रमांक मिळवत यश संपादन केले. या दोघांचा विशेष सत्कार करण्यात आला.

तसेच विजय माळी, महादेव डाके, दत्ता यादव, बालाजी जोगदंड, प्रेम दुड्डे, पांडू चव्हाण, अजय शिरसाठ आणि रवी मद्देवाड यांनीही केंद्रप्रमुख परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाला जीएसटी विभागाचे माजी कमिशनर डॉ. निळकंठ डाके, अंकुशराव डाके आणि माजी सरपंच सुधाकरराव शिनगारे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. जयपाल फड यांनी केले तर आभार प्रदर्शन विठ्ठल कुरमुडे यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अविनाश डाके, हंसराज मुदामे आणि गोविंद कांदे यांनी परिश्रम घेतले.

# आदिशक्ती अभियानांतर्गत आनंदवाडी ग्रामपंचायतीची जिल्हा समितीकडून तपासणी

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. १६ मार्च :** आदिशक्ती अभियानांतर्गत शिरूर अनंतपाळ तालुक्यातील आनंदवाडी ग्रामपंचायतीची जिल्हा स्तरीय समितीकडून शनिवार (दि. १४ मार्च २०२६) रोजी तपासणी व पाहणी करण्यात आली. तालुक्यात प्रथम क्रमांक मिळवत जिल्हा स्तरावरील टॉप ग्रामपंचायतींमध्ये आनंदवाडी ग्रामपंचायतीची निवड झाल्याने समितीने प्रत्यक्ष भेट देऊन विविध उपक्रमांची पाहणी केली.

या तपासणीदरम्यान समितीचे प्रमुख उपमुख्य कार्यकारी अधिकारी मा. जावेद शेख यांच्या हस्ते गावातील प्रत्येक कुटुंबातील महिलांना कचरा व्यवस्थापनासाठी कचरा कुंडीचे वितरण करण्यात आले. तसेच ग्रामपंचायतीत राबविण्यात येणाऱ्या




स्वच्छता, महिला सक्षमीकरण आणि कचरा व्यवस्थापनाशी संबंधित उपक्रमांची माहिती समितीने घेतली.

यावेळी समितीमध्ये मा. जावेदजी शेख (उपमुख्य कार्यकारी अधिकारी, महिला व बालकल्याण, जि.प. लातूर), घुगे साहेब (नायब तहसीलदार, लातूर), कानडे साहेब (सहाय्यक गटविकास अधिकारी, जि.प. लातूर), पाटील साहेब (सहाय्यक प्रकल्प अधिकारी, लातूर), जाधव साहेब (तालुका आरोग्य अधिकारी, लातूर), बोंबले साहेब (विस्तार अधिकारी, जि.प. लातूर), निकम साहेब (विस्तार अधिकारी, पंचायत समिती शिरूर अनंतपाळ), खलंग्रे मॅडम (अंगणवाडी पर्यवेक्षिका, शिरूर अनंतपाळ), चपटे साहेब (बाल संरक्षण समिती) तसेच राहुल शिरूरे (कनिष्ठ सहाय्यक, खउऊ्ढ शिरूर अनंतपाळ) उपस्थित होते.

याच प्रमाने आनंदवाडीचे सरपंच भागवत वंगे, जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बालाजी शिंदे, ह.भ.प. धोंडीराम आण्णा कोल्हे, उपसरपंच व्यंकट कल्ले, आशा वर्कर अनूसया पेद्देवाड, अंगणवाडी सेविका अश्र्विनी मरे, ग्रामपंचायत ऑपरेटर लक्ष्मण नाटकरे, ग्रामसेवक रंजित मरे, उठझ अनूसया शिरूरे, सुवर्णा आर्धे, अंजली सोनवणे, शांताबाई शिरूरे यांच्यासह गावातील महिला व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

